# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१.
(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )
Website : http//:barti.maharashtra.gov.in

## महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग - राज्यसेवा परीक्षा-२०२३ या परीक्षेसाठी नि:शुल्क, अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) साठी अर्ज मागविण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग - राज्यसेवा परीक्षा-२०२३ नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) खालील नमूद केलेल्या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. इच्छूक व पात्र युवक युवतींनी संबंधित प्रशिक्षण केंद्राशी संपर्क साधून त्या केंद्राकडे Online स्वरूपात अर्ज करावा.

उमेदवारानी प्रवेश परीक्षेचे स्वरुप, अर्ज भरण्याची पध्दत व मुदत, प्रशिक्षण कार्यक्रमाचे स्वरुप व सविस्तर माहिती करीता बार्टी संकेतस्थळ Website : http//:barti.maharashtra.gov.in यावर भेट द्यावी. तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज प्रियदर्शी चॅरीटेबल सोसायटी व्दारा संचलित प्रज्ञा प्रबोधिनी करिअर अकॅडमी , नागपूर यांच्या https://ppcacademy.org या संकेतस्थळावरील "REGISTRATION FOR BARTI MPSC TRAINING Program २०२३ " या टॅब वर उपलब्ध नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने दि. २२ जुलै, २०२२ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | महसुल विभाग | प्रशिक्षण केंद्राचे नाव / पत्ता / दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | नागपुर | प्रियदर्शी चॅरीटेबल सोसायटी, कुरखेडा द्वारा संचलित प्रज्ञा प्रबोधिनी करिअर अकॅडमी, प्लॉट नं. ६ अ, पहिला माळा, अपोलो फार्मसी च्या वर, जुना सुभेदार लेआऊट, शारदा चौक, HDFC बँक च्या बाजुला, अयोध्या नगर, नागपुर. मोबाईल क्र. ८६०५१२१९५०/९३५६६९७७१९ |

उपरोक्त प्रशिक्षण केंद्रामध्ये **२००** अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. (सकाळच्या सत्रातील १०० विद्यार्थ्यांची एक बॅच व दुपारच्या सत्रातील १०० विद्यार्थ्यांची दुसरी बॅच याप्रमाणे) त्यामध्ये **३०** टक्के जागा महिलांसाठी, **४** टक्के जागा **"दिव्यांग" असलेल्या व्यक्तींसाठी (Person with Disability), ५%** जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील (वाल्मिकी व तत्सम जाती- होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी, इ.) विद्यार्थ्यांकरीता आरक्षीत असतील, एकूण जागांच्या **५%** जागा विशेष बाब म्हणून राखीव ठेवण्यात याव्यात.

**पात्रता :-**

१) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास दाखला असावा.
२) उमेदवाराचे वय महाराष्ट्र लोकसेवा आयोग- राज्यसेवेच्या अटी व शर्ती नुसार असावे.
३) अर्जदार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. किंवा पदवीच्या शेवटच्या वर्षाला असावा.
४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांस बसणेसाठी पात्र असावा.
५) उमेदवारांनी अर्ज करताना उत्पन्नांचा दाखला जोडावा.

**विद्यार्थी निवडीचे निकष :-**

➢ प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने गुणवत्ता यादीतील रु. ८ लाखांपर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या सर्व पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :-**

**१)** वर नमुद प्रशिक्षण संस्थेकडे ऑनलाईन स्वरूपात अर्ज दाखल करण्याची **शेवटची तारीख २२/०७/२०२२**
**२) प्रशिक्षण कालावधी १० महिन्यांचा राहील.**
**३)** विहीत नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रांसहीत अर्ज दाखल केलेल्या पात्र उमेदवारांची चाळणी परीक्षा (MPSC CET-2021) वर नमुद संस्थेमार्फत **दिनांक ०७/०८/२०२२** रोजी घेण्यात येऊन उमेदवारांची गुणानुक्रमे कोंचिगसाठी निवड करण्यात येईल.
४) **प्रशिक्षण कोंचिग क्लास दिनांक १६/०८/२०२२ रोजी सुरु करण्यात येईल.**
**५)** निवड झालेल्यापैकी पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान रोज ४ तास व त्यापेक्षा जास्त कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच दरमहा एकूण ८० टक्के पेक्षा जास्त प्रशिक्षण कालावधीस उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ९०००/- विद्यावेतन देण्यात येईल.
**६)** विद्यार्थ्यांना टेस्ट सिरीज (ऑनलाईन/ ऑफलाईन) व विशेष शैक्षणिक साहित्य यासाठी प्रशिक्षण संस्थाना रक्कम रु. १५०००/- प्रति विद्यार्थी देण्यात येईल.
**७)** विहीत नमुन्यातील अर्ज वर नमुद केलेल्या प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयाकडून किंवा बार्टी, पुणे या संस्थेच्या वेबसाईट वरुन प्राप्त करुन भरता येईल. अधिक माहितीसाठी वर नमुद प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

**१)** उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो
**२)** सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत, उत्पन्नांचे प्रमाणपत्र व अधिवासी प्रमाणपत्र साक्षांकित प्रत.
**३)** कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण केलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती.
**४)** शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत/शालांत परीक्षेचे प्रमाणपत्र (Birth Certificate)

**(धम्मज्योती गजभिये)**
**महासंचालक, बार्टी, पुणे.**

Adv/ / २०२२/